विसापूर पॉवर हाऊसच्या जागेवर १०० बेडेड ईएसआयसी रुग्णालय, राज्य राखीव पोलिस बल केंद्र व महिला औद्योगिक वसाहत उभारण्याचा मार्ग मोकळा

आ.सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मांडला सर्वसमावेशक विकासाचा प्रस्ताव

मुख्यमंत्र्यानी दिले अप्पर मुख्य सचिव ऊर्जा यांना तात्काळ कार्यवाहीचे निर्देश

चंद्रपूर - राज्याचे माजी वने व सांस्कृतिक कार्य मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी बल्लारपूर तालुक्यातील मौजा विसापूर येथील बंद पडलेल्या पॉवर हाऊसच्या सुमारे ३१.३५ हेक्टर शासकीय जमिनीचा लोकहितासाठी उपयोग करण्याचा महत्त्वपूर्ण प्रस्ताव मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्यासमोर मांडला. मुंबई येथील वर्षा निवासस्थानी झालेल्या या भेटीत सादर केलेल्या सविस्तर निवेदनाची तात्काळ दखल घेत मुख्यमंत्र्यांनी ऊर्जा विभागाच्या अप्पर मुख्य सचिव यांना तात्काळ कार्यवाहीचे स्पष्ट निर्देश दिले.

विसापूर येथील ही जमीन अनेक वर्षांपासून वापराविना पडून असून, भौगोलिक स्थान आणि दळणवळणाच्या दृष्टीने ती सार्वजनिक उपक्रमांसाठी उपयुक्त असल्याचा मुद्दा निवेदनात आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी मांडला आहे. कामगारांच्या आरोग्यसुविधांसाठी १०० बेडेड ईएसआयसी (ESIC) अंतर्गत अत्याधुनिक रुग्णालयासाठी सुमारे ५ एकर जागा देण्याची मागणी करण्यात आली आहे. त्यामुळे चंद्रपूर व आजूबाजूच्या कामगारांना उपचारासाठी दूरवर जाण्याची गरज भासणार नाही.

कायदा-सुव्यवस्था मजबूत करण्यासाठी राज्य राखीव पोलिस बल (SRPF) केंद्राकरिता सुमारे ४५ एकर जागा उपलब्ध करून देण्याचा प्रस्तावही सादर करण्यात आला. या ठिकाणी प्रशिक्षण सुविधा, निवास व्यवस्था, क्रीडांगण, हॉस्पिटल, शाळा आणि नक्षलविरोधी मोहीमेच्या दृष्टीने आवश्यक अधोसंरचना उभारणे शक्य होणार आहे.

महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी तिसऱ्या टप्प्यात महिला सहकारी औद्योगिक वसाहत उभारण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. त्यासाठी १० एकर जागा उपलब्ध करून देण्याची मागणी केली. उद्योगासाठी आवश्यक सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध झाल्यास मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होऊन महिलांना स्वावलंबनाचा मजबूत आधार मिळेल, असे मुनगंटीवार यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी संपूर्ण प्रस्ताव गांभीर्याने ऐकून प्रशासकीय प्रक्रिया वेगाने पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. या निर्णयामुळे विसापूर परिसराचा सर्वांगीण विकास, कामगारांना दर्जेदार आरोग्य सुविधा, सुरक्षा यंत्रणेला बळकटी आणि महिलांसाठी नवे रोजगारक्षम क्षितिज निर्माण होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. या महत्त्वपूर्ण निर्णयासाठी घेतलेल्या पुढाकाराबद्दल लोकनेते, विकासपुरुष आमदार सुधीर मुनगंटीवार यांचे विशेष कौतुक व्यक्त केले जात आहे.

महाराष्ट्र विधानसभा

सुधीर मुनगंटीवार
विधानसभा सदस्य, बल्लारपूर, जि. चंद्रपूर

7722074199
Sudhir.Mungantiwar
sudhir.mungantiwar
www.sudhirmungantiwar.com
@SMungantiwar.com
SudhirMungantiwar
sudhirbhau.mungantiwar@gmail.com
bjp03069@gmail.com

जावक क्रमांक : 9155 /डिसेंबर/२०२५

दिनांक : ०१/१२/२०२५

प्रति,
मा.ना.श्री. देवेंद्रजी फडणवीस
मुख्यमंत्री,
महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई-३२

वंदे मातरम् !

**विषय: वल्लारपूर (जि. चंद्रपूर) येथे ईएसआयसी (ESIC) रुग्णालय, राज्य राखीव पोलीस बल तसेच महिला सहकारी औद्योगिक वसाहतीसाठी मौजा विसापूर ता. बल्लारपूर येथील बंद असलेल्या पॉवर हाऊसची ३१.३५ हेक्टर मधील जागा उपलब्ध करून देण्याबाबत.**

महोदय,

मौजा विसापूर, तालुका बल्लारपूर येथे बंद पडलेल्या पॉवर हाऊसची सुमारे ३१.३५ हेक्टर शासकीय जमीन दीर्घकाळापासून वापरात नसून निर्जन अवस्थेत आहे. ही जमीन खालील तिन्ही सार्वजनिक उपक्रमांसाठी अत्यंत उपयुक्त आणि भौगोलिक व स्थानदृष्ट्या योग्य ठरेल.

१) ESIC रुग्णालय :

चंद्रपूर जिल्ह्यातील हजारो श्रमीक आणि त्यांच्या कुटुंबांना अत्यल्प दरात सुसज्ज वैद्यकीय सुविधा मिळाव्यात म्हणून कामगारांसाठी अत्याधुनिक रुग्णालय (ESIC) अत्यावश्यक आहे. औद्योगिक, कोळसा व इतर क्षेत्रातील हजारो कामगार व त्यांच्या कुटुंबांना ईएसआयसी अंतर्गत अत्याधुनिक आरोग्य सुविधा मिळणार असून या करीता मौजा विसापूर ता.बल्लारपूर येथील बंद असलेल्या पॉवर हाऊसच्या जमिनीतील ५ एकर जागा या रुग्णालयासाठी मिळण्याची विनंती आहे.

२) राज्य राखीव पोलीस बल (SRPF) साठी :

राज्य शासनास कायदा व सुव्यवस्थेशी संबंधीत असलेले कर्तव्य जलदगतीने व प्रभावीपणे पार पाडता यावी म्हणून राज्य राखीव पोलीस बलाकरीता (SRPF) उपरोक्त जागेपैकी ४५ एकर जागा उपलब्ध करण्याची विनंती आहे. या ठिकाणी राज्य राखीव पोलीस बलाचे कवायत मैदान, शासकिय निवासस्थान, पोलीस अधिकारी विश्रामगृह, समादेशक कार्यालय, गटभंडार, शस्त्रागार, बॅचलर बॅरक, मेस, मोटर परिवहन विभाग, क्रिडा मैदान, दरबार हॉल, कार्यालय, हॉस्पीटल, उपहारगृह, शाळा, नक्षल अभियान डेमो मैदान, जीम, नक्षल बंदोबस्ताच्या ३ कंपन्यांकरीता मुक्कामाची व्यवस्था, मनोरंजन हॉल, व इतर आवश्यक कामकाजाकरीता ही जागा अत्यंत उपयुक्त आहे.

३) महिला सहकारी औद्योगिक वसाहत :

महिलांच्या स्वालंबनासाठी, उद्योजगतेला प्रोत्साहन देण्यासाठी तसेच ग्रामिण व शहरी भागातील महिला स्वयंरोजगार गटांना शाश्वत औद्योगिक अधोसंरचना उपलब्ध करुन देण्यासाठी महिला सहकारी औद्योगिक वसाहत उभारणे अत्यंत आवश्यक व काळाची गरज आहे. याकरीता उपरोक्त भुभागापैकी १० एकर जागा मिळण्याची विनंती आहे.

महाराष्ट्र विधानसभा

# सुधीर मुनगंटीवार

विधानसभा सदस्य, बल्लारपूर, जि. चंद्रपूर

7722074199
Sudhir.Mungantiwar
sudhir.mungantiwar
www.sudhirmungantiwar.com
@SMungantiwar.com
SudhirMungantiwar
sudhirbhau.mungantiwar@gmail.com
bjp03069@gmail.com

जावक क्रमांक :

दिनांक :

आपणास विनंती आहे की, मौजा विसापूर ता. बल्लारपूर येथील बंद पडलेल्या पॉवर हाऊसच्या ३१.३५ हेक्टर शासकीय जमीनीचे सर्वेक्षण करून संबंधीत यंत्रणेकडून पडताळणी करुन अहवाल मागवावा व या जमीनीपैकी ६० एकर जागा उपरोक्त महत्वपूर्ण प्रकल्पांना देवून सहकार्य करावे.

कृपया कार्यवाहीबाबत अवगत करावे.

आपला

(सुधीर मुनगंटीवार)

प्रत :

१) मा.जिल्हाधिकारी, चंद्रपूर
२) मा. पोलीस अधिक्षक, चंद्रपूर
३) मा. अधिक्षक अभियंता (स्थापत्य) महाराष्ट्र राज्य पारेषन कंपनी मर्या. विद्युत भवन, काटोल रोड, नागपूर
४) मा. कार्यकारी अभियंता (स्थापत्य) महाराष्ट्र राज्य पारेषन कंपनी मर्या. एच.व्ही.डी.सी. विश्रामगृह परिसर, उर्जानगर परिसर, चंद्रपूर
५) श्री. चंदनसिंग चंदेल, मु.पो.ता. बल्लारपूर जि.चंद्रपूर
६) श्री. हरीश शर्मा, जिल्हाध्यक्ष, भाजपा ग्रामिण, चंद्रपूर
७) श्री. रणंजय सिंह, शहर अध्यक्ष, भाजपा मु.पो.ता. बल्लारपूर जि.चंद्रपूर
८) सौ. रेणूकाताई दुधे मु.पो.ता. बल्लारपूर जि.चंद्रपूर